॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या युवारंग महोत्सवात नोंदणी करण्यासाठी महाविद्यालयांना १ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

दि. ७ ते ११ ऑक्टोबर या कालावधी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि के.सी.ई. सोसायटीचे मुळजी जेठा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मु.जे. महाविद्यालयात युवारंग युवक महोत्सव होत आहे. या महोत्सवात सहभागी होणाऱ्या महाविद्यालयांसाठी संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणीसाठी लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. २७ सप्टेंबर पर्यंतची नोंदणीची मुदत आता विद्यापीठाने वाढविली असून १ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अशी माहिती विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्राच्या वतीने दि. २ ऑक्टोबर ते ६ ऑक्टोबर या कालावधीत गांधी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

२ ऑक्टोबर रोजी विद्यापीठाच्या महात्मा गांधी टेकडीवर सकाळी ८ ते ९ या कालावधीत भजन प्रभात होणार आहे. याच दिवशी एस.एस.व्ही.पी.एस. महाविद्यालय धुळे येथे निबंध स्पर्धा होईल. मंगळवार दि. ३ ऑक्टोबर रोजी ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्ते डॉ. सुगन बरंट यांचे सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता व्याख्यान होईल. दि. ४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी पोस्टर व वक्तृत्व स्पर्धा होणार आहे. दि. ५ ऑक्टोबर रोजी अमळनेर येथील प्रताप तत्वज्ञान केंद्रात एक दिवसीय गांधी विचार शिबीर आणि दि. ६ ऑक्टोबर रोजी नंदुरबार येथील एकलव्य प्रशिक्षण केंद्रात श्रमदान शिबीर होणार आहे अशी माहिती कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे प्र. संचालक प्रा. म.सु. पगारे, रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे, गांधी अध्ययन केंद्राचे विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडीया यांनी दिली.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २७ सप्टेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी